१) लोकसत्ता पान क्र. ४

दि. 05/01/23

# वीज कंपन्यांचे खासगीकरण नाहीच!

## देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही : कर्मचाऱ्यांचा संप मागे

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**


**मुंबई, नागपूर :** शासकीय वीज कंपन्यांचे खासगीकरण करणार नसल्याचे स्पष्ट करतानाच, अदानी कंपनीस वीज वितरण परवाना देण्यासंदर्भात सरकार वीज नियामक आयोगापुढे भूमिका मांडेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिली. त्यामुळे शासकीय वीज कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांनी मंगळवारी मध्यरात्रीपासून सुरू केलेला संप पहिल्याच दिवशी दुपारनंतर मागे घेतला.

अदानी वीज कंपनीने महावितरणच्या भांडुप परिक्षेत्रात वीज वितरण परवाना मिळविण्यासाठी राज्य वीज नियामक आयोगाकडे अर्ज दाखल केला आहे. काही औष्णिक व जलविद्युत प्रकल्प आणि पारेषण वाहिन्यांच्या खासगीकरणाचे प्रस्ताव आहेत. शासकीय वीज कंपन्यांमधील खासगीकरण आणि सुमारे ४० हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्याच्या मुद्द्यांवर वीज कंपन्यांमधील सुमारे ८६ हजार नियमित आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांनी मंगळवारी मध्यरात्रीपासून संप सुरू केला होता.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीज कंपन्यांमधील ३२ संघटनांच्या पदाधिकाऱ्यांबरोबर बुधवारी चर्चा केली. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर चर्चा होऊन तोडगा काढण्यात आला.

''आमची सकारात्मक चर्चा झाली असून, संघटनांना मान्य असलेला तोडगा काढण्यात आला आहे. दिल्लीच्या धर्तीवर शासकीय वीज कंपन्यांचे खासगीकरण करण्याचा राज्य सरकारचा कोणताही विचार नाही. वीज कायद्यातील तरतुदींनुसार एका खासगी कंपनीने वीज नियामक आयोगाकडे वीज वितरण परवाना मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. यासंदर्भात संबंधित कंपनीने अधिसूचना जारी केली असून, आता आयोगाकडूनही ती काढली जाईल. या खासगी कंपनीस परवाना दिल्यास काय परिणाम किंवा नुकसान होईल, याबाबत राज्य सरकारने आयोगापुढे भूमिका मांडावी, अशी संघटनांची मागणी आहे. त्यानुसार कायद्यात जी आयुधे आहेत, त्यानुसार राज्य सरकार आणि वीज कंपन्यांकडून आयोगापुढे बाजू मांडली जाईल'', असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### खासगीकरणाला लघुउद्योजकांचा पाठिंबा



**ठाणे :** स्पर्धेच्या युगात अधिकाधिक कंपन्या तयार झाल्या तरी कमी पडतील एवढी स्पर्धा निर्माण होणे आवश्यक आहे, अशी स्पष्ट भूमिका महावितरण कंपनीच्या खासगीकरणासंदर्भात ठाणे स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन (टिसा) या उद्योजकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनेने बुधवारी मांडली. स्पर्धेच्या युगात ग्राहकास स्वायत्तता हवी असेल तर ती विनानिर्बंध मिळायला हवी, परंतु दबावतंत्र वापरून अशा प्रकारे ग्राहकांना वेठीस धरण्यात येऊ नये असेही संघटनेने स्पष्ट केले. त्यामुळे महावितरणच्या खासगीकरणाला उद्योजकांचा पाठिंबा असल्याचे स्पष्ट झाले आहे.

ठाणे जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रात भिवंडी, कळवा वगळता महावितरण कंपनीकडून विद्युतपुरवठा केला जातो. परंतु महावितरणचा विद्युतपुरवठा खंडित होणे, अवाजवी विद्युत देयकाचा फटका लघु उद्योजकांना सहन करावा लागतो. त्यामुळे उद्योजकांमध्ये महावितरणच्या सेवेविषयी नाराजीचा सूर दिसून येत आहे. महावितरणच्या भांडुप कार्यक्षेत्रात अदानी कंपनीस वीज वितरण परवाना देऊ नये तसेच कंपनीचे खासगीकरण करू नये यासाठी महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती कंपनीचे कर्मचारी बुधवारी संपावर गेले. होते त्यानंतर 'टिसा' या लघु उद्योजकांच्या संघटनेने भूमिका मांडली.

मुंबईमध्ये दोन-तीन वीजपुरवठादार आहेत. त्यामुळे कधीच वीज कमी पडत नाही व अडचणी निर्माण होत नाहीत. हे राज्यभर राबवायलाच हवे. कारण स्पर्धात्मक बाजारात आपोआपच ग्राहकांचे हित व योग्य बाजारभाव या दोन्हींचाही मेळ पुरवठादाराला घालावा लागेल आणि त्यातून महाराष्ट्राचा उद्योग व्यवसाय भरभराटीला येईल, असेही 'टिसा'कडून स्पष्ट करण्यता आले.

### महानिर्मितीच्या मदतीला अदानीसह परराज्यातीलही ७१ अभियंते

**नागपूर :** तीन शासकीय वीज कंपन्यांतील कर्मचाऱ्यांनी ३ जानेवारीच्या मध्यरात्रीपासून संप पुकारला होता. परंतु संपकाळात महानिर्मितीची वीजनिर्मिती बाधित होऊ नये म्हणून अदानी समूहासह परराज्यातील एकूण ७१ अभियंते महानिर्मितीच्या विविध केंद्रात तैनात करण्यात आले होते. संपादरम्यान महानिर्मितीला ६ हजार मेगावॅट वीजनिर्मिती करायची होती. त्यासाठी अदानी, टाटा पॉवर, एन.टी.पी.सी. लिमिटेड, मध्य प्रदेश विद्युत मंडळातील तब्बल ७१ अभियंते महानिर्मितीच्या राज्यातील नऊ प्रकल्पात तैनात करण्यात आले होते.

२) पूढारी पान क्र. ३

### पेल्हार पोलिसांकडून दोन सराईत आरोपींसह १ लाख २९ हजारांचा गांजा ताब्यात

**भाईंदर :** पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नालासोपारा पूर्वेच्या बिलालपाडा तलाव परिसरात एक व्यक्ती गांजा विकण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अंमलदार सचिन बळीद यांना मिळाली. त्या आधारे वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाने पोलिसांच्या पथकाने त्याठिकाणी सापळा रचुन मैदुल शेख ऊर्फ बंगाली, रा. बिलालपाडा, नालासोपारा पूर्व व सुनिल पवार, रा. नालासोपारा पश्चिम यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांची झाडाझडती घेतली असता त्यांच्याजवळ ५ किलो ५० ग्रॅम वजनाचा सुमारे ७३ हजार ५०० रुपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ व ५ हजार ५०० रुपये रोख रक्कम आढळून आली. पोलिसांनी आढळलेल्या मुद्देमालासह आरोपींकडून अंमली पदार्थाच्या विक्रीसाठी वापरण्यात येणारी मोटार सायकल असा एकुण १ लाख २९ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आरोपींविरोधात पेल्हार पोलीस ठाण्यात एनडीपीएस अधिनियम १९८५ चे कलम ८(क), २०(ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना ७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

३) लोकसत्ता पृ. ३

### बाल कामगाराची सुटका

**वसई :** भाईंदर, नवघर येथील एका बेकरीत काम करणाऱ्या एका १४ वर्षीय बालकाची मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध शाखेने सुटका केली आहे. यूपी महाराष्ट्र बेकरीच्या मालकाने एका बालकाला कामावर ठेवले असून, त्याचा छळ केला जात असल्याची माहिती मीरा-भाईंदर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध शाखेला मिळाली होती. त्याआधारे पोलिसांनी सापळा रचून मंगळवारी कारवाई करत या बालकाची सुटका केली. याप्रकरणी एका आरोपीला अटक केली आहे. तर एक आरोपी फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

CamScanner

४) लोकसत्ता पू. पान क्र. १ दि. 05/01/2023

## पोलीस आणि महापालिका यंत्रणेची दमछाक

# नशेबाजाच्या 'सुटकेसाठी' पाच तासांचा थरार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**वसई :** एका इमारतीवर चढून बसलेल्या नशेबाजाला खाली आणण्यासाठी पोलीस आणि यंत्रणेला चांगलीच दमछाक करावी लागली. बुधवारी सकाळी हा नशेबाज तरुण नालासोपारा येथील एका इमारतीवर चढून बसला होता. तब्बल पाच तासांनी त्याला खाली आणण्यात यश आले. नशामुक्ती केंद्रात जायचे नसल्याने हा तरुण इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर चढून बसला होता.

नालासोपारा पूर्वेच्या सेंट्रल पार्क येथील दत्तनगर परिसरात साई दत्त नावाची इमारत आहे. या इमारतीवर बुधवारी पहाटेच्या सुमारास एक तरुण चढला होता. इकडून तिकडे उड्या घेत असल्याने चोर असल्याचा संशय आला. माजी नगरसेवक अरुण जाधव यांनी पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला माहिती दिली. तुळिंज पोलीस तसेच पालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. त्याला पकडण्याचे प्रयत्न सुरू झाले. हा तरुण सर्वांना चकमा देत इमारतीवर उड्या मारत होता. तो चोर नसून याच परिसरात राहणारा नशेबाज नितीन अग्रवाल नावाचा तरुण असल्याचे समजले. अखेर पोलीस आणि स्थानिकांनी त्याची समजूत काढल्यानंतर तो खाली आला. त्याला नशा मुक्ती केंद्रात उपचारासाठी टाकणार होते. तिथे जाण्याचे टाळण्यासाठी तो घरातून पळून इमारतीवर चढला होता.

> “आम्ही ५ तास त्याला खाली उतरविण्याचे प्रयत्न करत होतो. शिडी टाकली तरी तो फेकून द्यायचा. त्यामुळे त्याची समजूत काढून खाली आणण्यासाठी ५ तास लागले. त्याला नंतर कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आले आहे.
>
> - राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुळींज पोलीस ठाणे

५) पुढारी पान क्र. 4

# मेट्रो कारशेड भूसंपादनाच्या अधिसूचनेची सुनावणी भाईंदरमध्येच होणार?

## ग्रामस्थांच्या कोकण विभागीय आयुक्तांकडे १२०० हरकती

भाईंदर : पुढारी वृत्तसेवा

एमएमआरडीएने भाईंदर येथील मुर्धा, राई व मोर्वा गावातील ग्रामस्थांच्या जागेत मेट्रो कारशेड प्रस्तावित केली असून त्याविरोधात ग्रामस्थांनी कोकण विभागीय आयुक्तांकडे १२०० हरकती दाखल केल्या आहेत. त्यावरील सुनावणी येत्या ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान नवी मुंबई येथील कोकण भवनमध्ये आयोजित करण्यात आली आहे. त्याला ग्रामस्थांनी विरोध करीत आ. प्रताप सरनाईक यांच्या माध्यमातून कोकण विभागीय नगररचना विभागाचे सहसंचालक भोपळे यांना भाईंदरमध्येच सुनावणी आयोजित करण्याची विनंती केली. ती मान्य करीत मेट्रो कारशेडवरील सुनावणी भाईंदरमध्येच होणार असल्याचे कारशेड विरोधक भुमीपुत्र सामाजिक समन्वय संस्थेचे अध्यक्ष अशोक पाटील यांनी सांगितले.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार एमएमआरडीएने भाईंदर येथील मुर्धा, राई व मोर्वा गावातील सुमारे ३५ हेक्टर जागेत मेट्रो कारशेड प्रस्तावित केली. त्यानुषंगाने कोकण विभागीय आयुक्त कार्यालयाने कारशेडसाठी जागेच्या भूसंपादनाची अधिसूचना ९ सप्टेंबर २०२२ रोजी जारी केली. त्याला गावातील ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवित अधिसूचनेविरोधात १ हजार २०० हरकती दाखल केल्या. त्यावरील सुनावणी ३० जानेवारी पासून नवी मुंबई येथील कोकण भवन येथे आयोजित करण्यात आल्याचे पत्र कारशेड भूसंपादनाच्या अधिसूचनेवर हरकती घेणाऱ्या ग्रामस्थांना पाठविण्यात आल्या आहेत. त्यावर ग्रामस्थांनी भुमीपूत्र सामाजिक समन्वय संस्थेमार्फत आ. प्रताप सरनाईक यांची भेट घेत कोकण भवन येथे आयोजित केलेली सुनावणी भाईंदरमध्येच आयोजित करण्याची मागणी केली. सरनाईक यांनी देखील ग्रामस्थांच्या जागेत कारशेड प्रस्तावित न करता ती उत्तन मधील शासकीय जागेत प्रस्तावित करण्याची मागणी नुकत्याच पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती.

मुख्यमंत्र्यांनी सरनाईक यांची मागणी मान्य करीत एमएमआरडीएला प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र कोकण विभागीय आयुक्तांनी जारी केलेल्या कारशेड भूसंपादन अधिसूचनेवरील हरकतींवर येत्या ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान कोकण भवन येथे सुनावणी आयोजित केलेली सुनावणी कोकण भवन ऐवजी भाईंदरमध्येच आयोजित करण्याची मागणी सरनाईक यांनी कोकण विभागीय नगररचना विभागाचे सहसंचालक भोपळे यांच्याकडे केली. ती मान्य करीत नगररचना सहसंचालकांनी भाईंदरमध्येच सुनावणी घेण्यात येणार असल्याचे सांगितले. यामुळे ग्रामस्थांना दिलासा मिळाला असून त्यांचा नवी मुंबई येथे सुनावणीसाठी जाण्याचा त्रास वाचणार असल्याचे अशोक पाटील यांनी सांगितले.

६) लोकसत्ता पू. पान क्र. 3

## एटीएम सेंटरमध्ये फसवणूक

**नालासोपारा :** पेल्हार येथील रहिवासी अनिल यादव हे वसई फाटा येथील 'हिंता'ची बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले असताना तेथे असलेल्या एका अनोळखी व्यक्तीने त्यांच्या एटीएम कार्डची अदलाबदली करून त्यांच्या खात्यातून २५ हजार रुपये वटवल्याची घटना घडली आहे. यादव यांच्या मोबाइलवर पैसे वटवल्याचा संदेश आल्यावर त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यांनी आपले एटीएम कार्ड तपासले असता त्यावर दुसरे कुणाचे तरी नाव असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी पेल्हार पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

CamScanner

७) पुढारी पान क्र. ३

दि. 05/01/2023

# मटका जुगार चालवणाऱ्यांवर अर्नाळा पोलीस ठाण्याची कारवाई; ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विरार पश्चिमेच्या पद्मावती नगर परिसरात असलेल्या देव रेसीडेन्सी बिल्डींगमध्ये काही व्यक्ती बेकायदेशीररित्या मटक्यावर पैसे लावुन जुगार चालवत असल्याची माहिती पोलिसांना २ जानेवारी रोजी सायंकाळी ४.१० वाजता मिळाली. त्या अनुषंगाने अर्नाळा पोलिसांनी त्या इमारतीवर छापा टाकला असता एक व्यक्ती मोबाईलवरुन समोरील व्यक्तीला आकडे सांगत असल्याचे तर इतर दोन व्यक्ती मोबाईलवर काहीतरी करीत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी त्या व्यक्तींचे मोबाईल तपासले असता त्यांच्या मोबाईलमध्ये मटका जुगाराचे आकडे तसेच त्यांच्यापैकी एकाकडे असलेल्या कागदावर आकडे व पैसे लिहिलेले दिसुन आले.

पोलिसांनी त्या व्यक्तींना ताब्यात घेतले असता त्यांची नावे हितेन सुरेश सोमय्या, सुरेश मगनलाल सोमय्या व मुकेश सुरेश सोमय्या सर्व रा. पदमावती नगर, बोळींज, विरार (प), असल्याचे समोर आले.

पोलिसांनी आरोपींकडून रजिस्टरचे पेपर व त्यावर मटका जुगाराचे वेगवेगळे तारखेचे आकडे लिहलेले असे एकुण ३७ पेपर्ससह १२ हजार रुपये किंमतीचे एचपी लिंक टँक वायरलेस ४१९ चे कलर प्रिंटर, प्रत्येकी १० हजार रुपये किंमतीचा विवो कंपनीचे २ मोबाईल व रेडमी कंपनीचा स्काय ब्लु तसेच केशरी रंगाचे २ मोबाईल व ७ लाख ९५ हजार ६५० रुपये रोख रक्कम असा एकुण ८ लाख ४७ हजार ६५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आरोपींविरोधात अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार अधिनियम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

८) लोकसत्ता पू. पान क्र. ४

# वसई-विरारमध्ये फटाक्यांची बेकायदा दुकाने

## दुर्घटनेची भीती, कायमस्वरूपी परवाना घेण्याची गरज

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**विरार :** सोलापूरमधील पांगरी गावात फटाक्याच्या कारखान्याला आग लागल्याने नऊ कामगारांना आपला जीव गमवावा लागला होता. या घटनेमुळे फटाक्यांच्या बेकायदा दुकानांचा आणि गोदामांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वसई-विरार परिसरातही अनेक ठिकाणी फटाक्यांची दुकाने उघडण्यात येतात, तर काही ठिकाणी गोदामे आहेत. मात्र यातील एकाही विक्रेत्याला कायमस्वरूपी फटाका विक्री आणि साठवणुकीचा परवाना देण्यात आलेला नाही. या बेकायदा दुकानांमुळे शहरात मोठ्या दुर्घटनेची भीती व्यक्त होत आहे.

विरारमध्ये मुख्यत्वे दिवाळीच्या दरम्यान फटाके विक्रीसाठी तात्पुरते परवाने दिले जातात. या परवान्यानुसार ठरावीक कालावधीसाठी फटाक्यांची विक्री करता येते. कायमस्वरूपी फटाके विक्रीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासह विविध यंत्रणांकडून परवानग्या घेणे गरजेचे आहे. फटाक्यांच्या दुकानात आग लागू नये, यासाठी योग्य ती खबरदारी घेणे तसेच सक्षम अग्निप्रतिबंधक यंत्रणा असणे आवश्यक आहे. मात्र विरारमध्ये सुरू असलेल्या विविध दुकानांत विक्रेत्यांनी कायमस्वरूपी परवाने घेतलेले नसल्याची माहिती समोर आली आहे.

विरारमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, चंदनसार रोड, विरार पश्चिम आदी परिसरांत फटाक्यांची दुकाने आहेत. यातील काही दुकाने ही नागरी वस्तीत असून, या दुकानांना कोणतेही परवाने देण्यात आलेले नाहीत. तसेच काही दुकाने मोठ्या प्रमाणात फटाक्यांची साठवणूक करतात. त्यात सुरक्षेच्या कोणत्याही यंत्रणा नाही. यामुळे सोलापूरप्रमाणे विरारमध्ये दुर्घटनेची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

याबाबत मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे परिमंडळ ३चे पोलीस उपायुक्त सुहास बावचे यांनी सांगितले की, पोलिसांकडून दिवाळीच्या दिवसांत तात्पुरते परवाने दिले जातात. पण कायमस्वरूपी परवाने विक्री आणि साठवणुकीचे परवाने घेणे आवश्यक आहे. शहरातील फटाके विक्रेत्यांची तपासणी करून त्यांनी कायमस्वरूपी परवाने घेतले आहेत का, याची पाहणी केली जाईल. ज्यांच्याकडे परवाने नसतील, अशा विक्रेत्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल.

CS CamScanner

९) म. टा. पु. पान क्र. १

दि. 05/01/2023

# घोषणाबाजी, आंदोलन; मात्र गैरसोय टळली

## ७०० वीज कर्मचारी संपात सहभागी

म. टा. वृत्तसेवा, पालघर

महावितरण कंपनीच्या खासगीकरणाविरोधात राज्यभरातील कर्मचाऱ्यांनी बुधवारपासून पुकारलेल्या ७२ तासांच्या संपात पालघर जिल्ह्यातील ७०० हून अधिक कर्मचारी सहभागी झाले. संपकरी कर्मचाऱ्यांनी पालघर येथील महावितरणच्या कार्यालयाबाहेर एकत्रित जमून आंदोलन केले. यावेळी केंद्र व राज्य सरकारविरोधात, तसेच अदानी समूहाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. संध्याकाळी हा संप मागे घेण्यात आला.

महावितरण, महानिर्मिती, महापारेषण कंपनीतील खासगीकरण धोरण बंद करावे, महावितरणमध्ये अदानी कंपनीला समांतर वीज वितरणाचा परवाना देऊ नये, कंत्राटी आऊटसोर्सिंग व सुरक्षारक्षकांना कायम करावे आदी मागण्यांसाठी महावितरणमधील ३१ संघटनांचे कर्मचारी मंगळवारी रात्री १२ वाजल्यापासून संपावर गेले. बुधवारी सायंकाळपर्यंत फारशी कुठे वीजपुरवठा खंडित झाल्याची तक्रार नोंदवली गेली नाही. बोईसर एमआयडीसी, पालघरात बिडको, माहीम, शिरगाव, आल्याळी, पिडको, टेम्भोडे, वेऊर, घोलविरा, नवली, धनसार, वाडा, तलासरी, वसई, नालासोपारा आदी भागात फटका बसला नसल्याचे सांगण्यात आले. पालघर नगर परिषदेने तीन तास पाणीपुरवठा करून नागरिकांची गरज पूर्ण केली.



### वसईतही आंदोलन

वसई : महावितरणचे अधिकारी, कर्मचारी यांनी बुधवारी वसई येथील महावितरणच्या मुख्य कार्यालयाजवळ एकत्र येत आंदोलन केले. 'अदानी गो बॅक', 'अदानी हटाव, देश बचाव' अशा घोषणा देत वसईतील महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी कंपनीच्या खासगीकरणाविरोधात आंदोलन केले. महावितरणचे कर्मचारी, अधिकारी, इंजिनीअर तसेच कंत्राटी कामगार असे एकूण शेकडो सहभागी झाले. पहिल्या दिवशी या संपाचा कोणताही फटका वसईला बसला नाही. संध्याकाळी संप मागे घेण्यात आला. त्यानंतर तिसऱ्या पाळीत असलेल्या कर्मचाऱ्यांनी आपले काम सुरू केले. नियंत्रण कक्षाच्या क्रमांकावर दिवसभरात किरकोळ तक्रारी आल्या, त्यांचे निराकरण करण्यात आल्याचे महावितरणकडून सांगण्यात आले.

१०) म. टा. पान क्र. 1

# 'स्वराज्यरक्षक ही व्यापक संकल्पना'

## छत्रपती संभाजी महाराजांबाबतच्या भूमिकेवर पवार ठाम

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

'छत्रपती संभाजी महाराजांसंदर्भात मी कोणतेही वादग्रस्त विधान केलेले नाही. स्वराज्यरक्षक ही संकल्पना व्यापक, सर्वसमावेशक आणि महाराजांच्या कार्यकर्तृत्वाला शोभणारी आहे. त्यामुळे स्वराज्यरक्षक या भूमिकेवर मी आजही ठाम आहे', अशा शब्दांत विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी बुधवारी भूमिका मांडली. 'नागपूरच्या अधिवेशनातील माझ्या त्या भूमिकेवर सभागृहात कोणत्याही आमदाराने विरोध केला नाही. पण दोन दिवसांनंतर माझ्या वक्तव्याबाबत भाजपचे आंदोलन सुरू झाले. कारण भाजपच्या मंडळींचा सूत्रधार त्यादिवशी सभागृहात नव्हता', असा टोला पवार यांनी लगावला आहे.

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी संभाजी महाराजांना धर्मवीर संबोधण्यात काही चूक नाही, तसेच सावरकर व गोळवलकर यांनी संभाजी महाराजांबाबत लिहिलेल्या गोष्टी आता उगाळण्यात अर्थ नाही, असे म्हणत अजित पवार यांच्या भूमिकेच्या विपरित भूमिका घेतली होती. मात्र त्यानंतरही अजित पवार आपल्या भूमिकेवर ठाम राहिले आहेत. 'छत्रपती संभाजी महाराजांचे भव्य स्मारक पुणे जिल्ह्यातील वढू बुद्रुक आणि तुळापूरला करण्यासाठी महाविकास आघाडी सरकारच्या काळात २५० कोटींहून अधिकचा निधी अर्थमंत्री म्हणून राज्याच्या (पान ७वर)



### 'अजित पवारांनी माफी मागावी'

'छत्रपती संभाजी महाराज हे धर्मवीर होतेच. त्यांना ही पदवी तुम्ही-आम्ही दिलेली नाही. आधीपासूनच त्यांना धर्मवीर म्हटले जाते. औरंगजेब हा अत्याचारिच होता. त्याने मंदिरांना हानी पोहोचवली होती. त्यामुळे अजित पवार यांचे वक्तव्य हे त्यांना न शोभणारे असून ते निंदाजनक आहे. महापुरुषांच्या अवमानाबद्दल माफी मागावी, अशी मागणी होत आहे. तशीच अजित पवार यांनीही या वक्तव्याबद्दल माफी मागावी', असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

# 'स्वराज्यरक्षक ही व्यापक संकल्पना'

(पान १वरून)

अर्थसंकल्पात उपलब्ध करून दिला होता, असे अजित पवार यांनी पुराव्यानिशी मांडले. पण सातत्याने महापुरुषांचा अवमान करणाऱ्या राज्यपालांसह भाजपच्या वाचाळवीरांना वाचविण्यासाठी आणि त्यांच्या बेतालपणापासून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठीच भाजपकडून माझ्या विरोधात आंदोलनाचे षडयंत्र रचण्यात आले', अशी त्यांनी केली.

'इतिहास संशोधकांनी या मुद्द्यांवर संशोधन करून वस्तुनिष्ठ पुराव्यांच्या आधारे मांडणी करावी. खरा इतिहास समोर आणावा. लोकांच्या प्रबोधनासाठी ते उपयुक्त ठरेल. राजकीय हेतूने वातावरण तापवून, विद्वेषाचे राजकारण करण्याचा काहींचा उद्योग कदापि सहन केला जाणार नाही. महाराजांच्या स्मारकाची घोषणा करून आम्ही थांबलो नाही तर त्यासाठीची आवश्यक सर्व प्रक्रिया पूर्ण केली. छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाने 'छत्रपती संभाजी महाराज शौर्य पुरस्कार' योजना आम्ही सुरू केली. मात्र, शिंदे-फडणवीस सरकारने यासंबंधी कोणत्याही हालचाली केल्या नाहीत. छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक भाजपला मान्य नाही का', असा सवाल अजित पवार यांनी यावेळी केला.



'आजपर्यंत कोणत्याही महापुरुषाबद्दल अथवा स्त्रीबाबत मी वादग्रस्त विधान केलेले नाही. राज्यपालांसह भाजपचे मंत्री, काही आमदार, भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते सातत्याने महापुरुषांचा अवमान करीत आहेत. त्याबद्दल भाजपची मंडळी चकार शब्द काढत नाही. छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाचा आदर करून स्वराज्यरक्षक ही भूमिका मी मांडली. माझे इतिहासाचे वाचन, आकलनाच्या आधारे माझी जी भूमिका तयार झाली आहे ती मी विधानसभेत मांडली. मी इतिहासाचा संशोधक नाही. त्यामुळे त्यासंदर्भात जे तपशीलवार आरोप प्रत्यारोप होत आहेत, त्याबाबत मी युक्तिवाद करणार नाही. तो विषय इतिहास संशोधक, अभ्यासकांचा आहे. नव्या पिढीतील इतिहास संशोधक इंद्रजित सावंत तसेच स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचा खरा इतिहास लोकांपर्यंत नेण्याचा ध्यास घेतलेले खा. डॉ. अमोल कोल्हे यांनी याबाबत तपशीलवार विवेचन केले आहे', असेही अजित पवार म्हणाले.

CS CamScanner

दि. 05/01/2023

11) म. टा. पु. पान क्र. 1

12) पुण्यनगरी पु: पान क्र. 1

# 'रस्ते कर' वादात

## मिरा-भाईंदरमध्ये काँग्रेस, भाजपचा आंदोलनाचा इशारा

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदर महापालिकेने उत्पन्न वाढीच्या दृष्टीने नव्याने 'रस्ते कर' आकारण्याचा ठराव नुकताच मंजूर केला आहे. त्याची अंमलबजावणी आगामी आर्थिक वर्षापासून केली जाणार आहे. या निर्णयाविरोधात आता काँग्रेस व भाजपने आक्रमक भूमिका घेतली आहे. आगामी काळात कर आकारणी केल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करू, असा इशारा या दोन्ही पक्षांनी पालिका प्रशासनाला दिला आहे.

मिरा-भाईंदर महापालिका प्रशासनाने करोनाकाळात विविध उपाययोजना करण्यासाठी कोट्यवधींचा खर्च केला होता. हा खर्च राज्य सरकारकडून अनुदान स्वरूपात अद्याप प्राप्त झालेला नाही. त्यामुळे पालिकेच्या तिजोरीवर ताण आला आहे. दुसरीकडे, शहरातील खड्डेमय रस्त्यांतून शहरवासियांची सुटका करण्यासाठी कर्ज स्वरूपात निधी उभारून काँक्रीटच्या रस्त्याचे काम केले जात आहे. त्यामुळे कर्जाचे हप्ते व आर्थिक संकटाला तोंड देण्यासाठी उत्पन्नात वाढ करण्याच्या उद्देशाने आगामी आर्थिक वर्षापासून सामान्य करामध्ये दहा टक्के इतका 'रस्ते कर' आकारण्याचा ठराव पालिका प्रशासनाने नुकताच मंजूर केला आहे.

मात्र या निर्णयावर काँग्रेस तसेच भाजप या दोन्ही पक्षांनी हल्ला चढवला आहे. काँग्रेसचे प्रवक्ते प्रकाश नागणे यांनी याबाबत आपल्या पक्षाची भूमिका स्पष्ट केली. 'मिरा-भाईंदरमध्ये आधीपासूनच मलप्रवाह कर आकारला जात आहे. मात्र प्रत्यक्षात हा प्रकल्पच बंद असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिक्षण कर आकारला जात असला, तरी चांगल्या सुविधा विद्यार्थ्यांना प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे आणखी करवाढ करण्याचा निर्णय घेऊ नये,' अशी भूमिका प्रकाश नागणे यांनी मांडली.

भाजपचे जिल्हाध्यक्ष रवी व्यास यांनीही करवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांना भुर्दंड सहन करावा लागणार असल्याचे सांगत, प्रशासकीय राजवटीत करवाढीचा निर्णय घेण्यात येऊ नये, अशी भूमिका घेतली आहे. यावर प्रशासनाने पुनर्विचार करावा, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशारा दोन्ही पक्षांनी प्रशासनाला दिला आहे.




**वाढीव करामुळे नाराजी**

- आगामी वर्षापासूनचा नवीन कर वादात
- करवाढीविरोधात राजकीय पक्षांची आक्रमक भूमिका
- प्रशासकीय राजवटीत करवाढीचा निर्णय घेतल्याबद्दलही नाराजी

### कर आकारणीचा मुद्दा पेटणार !

मिरा-भाईंदर महापालिकेच्या सभागृहाची मुदत गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात संपुष्टात आली आहे. त्यामुळे कोणत्याही क्षणी पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका लागण्याची शक्यता आहे. त्यातच आता पालिका प्रशासनाने उत्पन्नवाढीसाठी नव्याने कर आकारण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाबाबत नागरिकांमध्ये नाराजी कायम राहिल्यास, त्याचा निवडणुकांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, नागरिकांच्या बाजूने भूमिका घेत, सर्वच राजकीय पक्षांकडून करआकारणीच्या निर्णयाला विरोध केला जाण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, आर्थिक संकटाला तोंड देण्यासाठी करआकारणी व्यतिरिक्त अन्य कोणताही पर्याय पालिकेकडे नसल्याने हा मुद्दा आगामी काळात पेटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

---

**In Short**

### हरवलेले मोबाईल पोलिसांकडून परत

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांना त्यांचे हरवलेले मोबाईल फोन परत मिळवून देत नवीन वर्षाची अनोखी भेट दिली आहे. मीरा रोड पोलीस ठाण्यात पोलीस स्थापना दिन सप्ताहानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात पोलीस उपायुक्त जयंत बजबळे परिमंडळ-१ यांच्या हस्ते एक ते दीड लाख रुपये किमतीचे हरवलेले १५ मोबाईल फोन शोधून परत देण्यात आले. यावेळी पोलीस उपायुक्त जयंत बजबळे, सहाय्यक पोलीस आयुक्त विलास सानप, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह बागल, पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मीरा रोड पोलीस ठाण्यात वर्षभरात बस, टॅक्सी, रिक्षा, दुकान या ठिकाणी विसरलेले किंवा हरवलेले मोबाईल फोनच्या अनेक तक्रारी दाखल झाल्या होत्या. मीरा रोड पोलिसांनी हरवलेल्या मोबाईल फोनचा शोध घेत ते परत नागरिकांना मिळवून दिले आहेत. पोलिसांच्या कामगिरीबद्दल नागरिकांकडून प्रशंसा करत आभार मानले जात आहेत. फोन हरवला अथवा चोरीला गेला असता त्याचा गैरवापर कोणी करू नये, यासाठी त्याची तक्रार पोलीस ठाण्यात करावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

CamScanner

लोकमत

# 'टॉवर'ला गावाचा नकार, महापालिकेचा होकार

## अजब कारभाराविरोधात स्थानिकांत नाराजी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : अर्नाळा ग्रामपंचायतीने ग्रामसभेत मोबाइल टॉवरला परवानगी नाकारली असताना वसई-विरार महापालिकेने मात्र या टॉवरला परवानगी दिल्याने वसई तालुक्यात चर्चेचा विषय झाला आहे.

अर्नाळा ग्रामपंचायत हद्दीतील सुभाष लेन येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या बाजूला अनधिकृतपणे मोबाइल टॉवरचे काम सुरू झाल्यानंतर याबाबत तेथील दिनेश सामंत आणि इतर ग्रामस्थांनी त्याला हरकत घेतली होती. याबाबत त्यांनी अर्नाळा ग्रामपंचायतीमध्ये तक्रार नोंदविल्यानंतर अर्नाळा ग्रामपंचायतीच्या २८ मे २०२१ रोजी झालेल्या ग्रामसभेत या टॉवरला परवानगी नाकारून तो टॉवर काढून टाकण्याचा ठराव संमत केला होता. त्याचप्रमाणे ग्रामस्थांनी याबाबत बांधकामाला परवानगी देणाऱ्या विशेष नियोजन प्राधिकरण असलेल्या महानगरपालिकेलाही याबाबत कळविले होते. या अनधिकृत मोबाइल



टॉवरचा प्रश्न विधानसभेतही गाजला होता. त्यावेळी विधानपरिषदेत सदरचा टॉवर हटविण्याचे आदेश वसई - विरार महापालिका आयुक्तांना दिल्याचे ग्रामविकास मंत्र्यांनी सांगितले होते. असे असताना विशेष नियोजन प्राधिकरण असलेल्या वसई - विरार महापालिकेने या टॉवरला परवानगी दिल्याने पालिकेने तत्कालीन ग्रामविकास मंत्र्यांच्या आदेशाला तसेच पंचायतराजमध्ये ग्रामसभा ही सार्वभौम असतानाही त्यांचे अधिकार डावलले आहेत.

या टॉवरला महावितरणने वीज जोडणी दिली होती. परंतु, ती जोडणी ग्रामस्थांच्या तक्रारीनंतर तोडण्यात आली आहे. याप्रकरणात तत्कालीन सिडकोचे नगररचनाकार रेड्डी यांनी त्यावेळेला बांधकामाला दिलेल्या परवानग्या अडचणीत आल्या होत्या. तेच रेड्डी सध्या महापालिकेत सहायक संचालक म्हणून काम पाहात असल्याने त्यांच्याकडे संशयाची सुई फिरताना दिसत आहे. याबाबत पालिकेचे प्रशासन तथा आयुक्त अनिलकुमार पवार यांची दिनेश सामंत आणि अर्नाळा ग्रामस्थांनी भेट घेतली असता त्यांनी याबाबत तक्रारीची दखल घेतली असून, या टॉवरला नोटीस काढण्याचे आदेश दिले आहेत.

### अधिकार डावलले

अनाळा ग्रामपंचायतीने परवानगी नाकारलेली असतानाही महापालिकेने या टॉवरला परवानगी दिल्याने पालिकेने तत्कालीन ग्रामविकास मंत्र्यांच्या आदेशाला तसेच पंचायतराजमध्ये ग्रामसभा ही सार्वभौम असतानाही त्यांचे अधिकार डावलले आहेत.

लोकमत

# वसईत वीज कर्मचाऱ्यांची घोषणाबाजी

## खासगीकरणाला तीव्र विरोध : कंपनी अदानी समूहाला विकली जाणार?

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** राज्यभरातील सरकारी वीज क्षेत्रातील कर्मचारी मंगळवार मध्यरात्रीपासून ७२ तासांच्या संपावर गेले होते. हा संप संध्याकाळी मागे घेण्यात आला आहे. अदानी इलेक्ट्रिसिटी कंपनीने महावितरणच्या कार्यक्षेत्रात समांतर वीज वितरण परवान्यासाठी अर्ज केला आहे. याद्वारे महावितरण कंपनी अदानी समूहाला विकली जाणार असल्याच्या समजुतीतून हा संप पुकारून वसईतील महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी कार्यालयाबाहेर आंदोलन केले.



वसई तालुक्यातील महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी खासगीकरणाविरोधात कार्यालयाबाहेर आंदोलन करीत घोषणाबाजी करताना अधिकारी-कर्मचारी.

महापालिका क्षेत्रामध्ये समांतर वीज वितरणासाठी परवाना मिळावा यासाठी अदानी इलेक्ट्रिसिटीने महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे अर्ज केला आहे. हा अर्ज म्हणजे महावितरण कंपनीचे खासगीकरण होत असल्याचा आरोप करीत वीज कामगार संघटनांनी हा संप पुकारला. सरकारने योग्य पावले न उचलल्यास १८ जानेवारीपासून बेमुदत संप पुकारला जाईल, असा इशारा कामगार संघटनांनी दिला आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी संघर्ष समिती यांनी या तीनदिवसीय संपाची हाक दिली आहे. त्यामध्ये राज्य सरकारी महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण या तिन्ही कंपन्यांमधील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

Hello Vasai
Page No. 2 Jan 05, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# टेम्पोने घेतला चौदा वर्षांच्या मुलाचा बळी

**नालासोपारा :** वसईत भरधाव टेम्पोने एका चौदा वर्षांच्या अल्पवयीन मुलाचा बळी घेतल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. वसईच्या मनीचा पाडा येथील रिचर्ड कंपाउंडमध्ये राहणाऱ्या सुमित गुप्ता हा मुलगा मंगळवारी दुपारी दोनच्या सुमारास रस्त्यावर खेळत असताना एका भरधाव टेम्पोने त्याला जोरदार धडक दिली. त्यात त्याचा गंभीर दुखापत झाल्याने मृत्यू झाला. मंगळवारी पेल्हार पोलिस ठाण्यात आरोपी वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Hello Vasai
Page No. 3 Jan 05, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# तुनीषाची आत्महत्या की?

शिज़ान खानच्या कुटुंबीयांनी पत्रकार परिषद घेत तुनीषा तिच्या आईमुळे कशी त्रासली होते हे उघड केले. त्या संदर्भातील एक ऑडिओ क्लिपही त्यांच्याकडे आहे.



त्यातच वनीता शर्मा मीरा रोडचे घर सामानासह सोडून गायब आहेत. पोलिस त्यांचा शोधही घेत आहेत. त्यातच तुनीषाने मृत्यूच्या दोन दिवस आधी डेटिंग ॲपवर अली नामक तरुणाशी मैत्री केली. ज्याने पोलिसांना तुनीषा तिच्या आईमुळे जिवाला कंटाळली होती, असे सांगितले. तसेच १६ कोटी रुपयांची मालकीण असलेल्या तुनीषाने तीन हजारांसाठी मैत्रिणीसमोर हात पसरल्याचा दावा करण्यात आला आहे. हे सगळे दावे तिच्या चाहत्यांना हादरवून टाकणारे असून, आता तुनीषाच्या मृत्यूस जबाबदार कोण? 'हू किल्ड तुनीषा?' असे सवाल उपस्थित होत आहेत.

Mumbai Main
Page No. 2 Jan 05, 2023
Powered by: erelego.com